LOKNETE DR. BALASAHEB VIKHE PATIL
(PADMA BHUSHAN AWARDEE)
PRAVARA RURAL EDUCATION SOCIETY

# ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE KOLHAR

Tal. Rahata, Dist. Ahmednagar, Pin - 413 710
NAAC Accredited at 'A' Grade with CGPA 3.10

# Studey Material

1. **Teacher : Dr. Satish A. Gonde**
2. **Course : B.Com.**
3. **Class : S.Y. B. Com**
4. **Semester : III**
5. **Subject : Business Economics (Macro)- I**
6. **Sub. Code : 233**
7. **Topic : Importance & Limitation of Business Economics**

## * व्यावसायिक अर्थशास्त्र महत्व-

व्यावसायिक अर्थशास्त्रामध्ये प्रामुख्याने उद्योग संस्थांच्या समस्यांचे आणि त्या समस्या सोडविण्यासाठी अर्थशास्त्रातील सिद्धांत, तत्व, संकल्पना, नियम व्यवहारात वापरात आणण्यासाठी अध्ययन करते. व्यावसायिक अर्थशास्त्राचे महत्व ~~स्पष्ट~~ पुढील प्रमाणे.

### (1) सक्षम व्यावसायिक प्रतिमान :-

व्यावसायिक अर्थशास्त्र, अर्थशास्त्रातील सिद्धांत, तत्व, संकल्पना नियम, साधने यांना व्यावहारिक रूप देवून उद्योग संस्थांच्या व्यवस्थापक व व्यवस्थापन मंडळाला उत्पादन विषयक निर्णय आणि भविष्यकालीन ~~निर्णय~~ नियोजन करण्यासाठी मदत करते. ~~म्हणून अर्थशास्त्राची व्यावहारिक~~ उपयुक्तता वाढते. उद्योगसंस्थेला योग्य निर्णय घेता येतात.

### (2) संकल्पनांचा वापर :

व्यावसायिक अर्थशास्त्र उद्योग संस्थेसमोर निर्माण झालेल्या समस्यांचे विश्लेषण आणि स्पष्टीकरण करण्यासाठी आणि समस्यांची सोडवणूक करण्यासाठी अर्थशास्त्रातील अनेक ~~समस्या~~ अनेक मुलभूत संकल्पनांचा व्यावहारिक वापर करत असते. अर्थशास्त्रातील मुलभूत संकल्पनांची माहिती व्यावसायिकांना झाल्यामुळे त्यांना निर्णय घेण्यास व नियोजन करण्यास तत्परता आणि कुशलता प्राप्त होते.

Scanned with OKEN Scanner

### ③ सांख्यिकीय माहितीचा पुरवठा -

मोठ्या व्यापारी उद्योगसंस्था बाजारात नव्याने प्रवेश करते आणि उद्योगाचा विस्तार, आधुनिकीकरण, करते तेव्हा ती बाजारसंबंधीची वेगवेगळी माहिती गोळा करते. त्याचे वर्गीकरण व विश्लेषण करून निष्कर्ष काढते आणि त्या आधारे निर्णय घेते. सांख्यिकीय माहिती कशी गोळा करायची याबाबत माहिती पुरविण्याचे कार्य व्यावसायिक अर्थशास्त्र करते.

### ④ आर्थिक संबंधाचे ~~पूर्व~~ पूर्वअंदाज -

व्यावसायिक अर्थशास्त्र उपभोक्त्यांचे उत्पन्न आणि मागणी, मागणीची लवचिकता आणि मागणी, उत्पादन खर्च आणि किंमत तसेच उत्पादन खर्चाच्या किंमत आणि नफा अशा अनेक व्यावसायिक घटकांमध्ये परस्पर जो आर्थिक संबंध असतात त्याचे पूर्वअंदाज व्यक्त करतात. या पूर्व अंदाजामुळे व्यावसायिकांना योग्य निर्णय घेण्यास मदत होते.

### ⑤ व्यावसायिक पूर्वअंदाज -

बाजारात वस्तूंची भविष्यात किती मागणी असेल भविष्यात उत्पादन, उत्पादन घटक किंमती, उत्पादन खर्च, किंमती, नफा इ. गोष्टी काय असतील याचे पूर्व अंदाज उद्योगसंस्थेच्या व्यवस्थापनास करावे लागतात. हे पूर्व अंदाज करण्यास व्यावसायिक अर्थशास्त्र मदत करते.

Scanned with OKEN Scanner

## * समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या मर्यादा (दोष)

समग्रलक्षी अर्थशास्त्र तात्विक व व्यावहारिक दृष्टीने महत्वाचे आहे परंतु या अर्थशास्त्राच्या वापरातील काही मर्यादा आहेत. या मर्यादा खालीलप्रमाणे

### (1) समूह एकजिनसी समजणे -

समग्रलक्षी अर्थशास्त्रामध्ये समूहाची आर्थिक रचना विचारात न घेता समूह एकजिनसी आहे असे मानले जाते. देशातील सरासरी वेतन हे सर्व व्यवसायातील वेतनाची बेरीज करून काढले जाते. परंतु रोजगाराची एकूण संख्या ही सरासरी वेतनावर अवलंबून नसते तर ती वेतनाच्या सापेक्ष रचनेवर अवलंबून असते.

### (2) वैयक्तिक अनुभवाचे सामान्यीकरणावर मर्यादा -

समग्रलक्षी अध्ययनात सरासरी किंवा एकूणाचा अभ्यास होतो. त्यामुळे वैयक्तिक परिणामांची बेरीज अथवा वैयक्तिक अनुभवाचे सामान्यीकरण करावे लागते. काही वेळेला वैयक्तिक किंवा लहान समूहाचे निष्कर्ष संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी लागू होत नाही. उदा- बँकेच्या प्रत्येक ठेवीदार कोणत्याही ठेवीमधून पैसे काढू शकतो. परंतु सर्वच ठेवीदार एकाच वेळी ठेवी काढल्यास बँकेकडे रोकड असते गृहीत धरले तर बँक बुडेल. त्यामुळे अर्थ वैयक्तिक अनुभवांचे सामान्यीकरण करताना काळजी घ्यावी.

### (3) समाज रचनेकडे दुर्लक्ष

अर्थव्यवस्थेत अनेक वर्ग असतात कामगार, शेतकरी, शेतमजूर, श्रीमंत - गरीब यांच्यामध्ये - या वर्गाचा स्वतंत्रपणे विचार समग्रलक्षी अर्थशास्त्रात होत नाही. सर्वसाधारणपणे किंमत पातळीतील बदलाचा या विविध वर्गावर वेगवेगळे

Scanned with OKEN Scanner

परिणाम होणार काहींना फायदा होणार तर काहींना तोटा, कधी कधी शेतमालाच्या किंमती घसरतात आणि त्या औद्योगिक मालाच्या किंमती वाढतात. ~~परंतु~~ त्यामुळे सर्वसामान्य किंमतपातळी स्थिर राहत ~~असल्याचे~~ राहते. परंतु किंमत निर्देशांकाशी वेगवेगळे उपाय केले नाही तर लोकांचे नुकसान व शोषणकारी फायदा होईल. याचाच अर्थ समग्रलक्षी अर्थशास्त्र समायोजनेकडे दुर्लक्ष करते.

(4) स्थूल पातळीवरील निष्कर्ष ~~व्यक्ती~~ धोरणांबाबतच्या व्यक्तीसे ठरवण्याची शक्यता –

समग्र पातळीवरील सरासरी व एकूण / समूह बाबतीत काढलेले निष्कर्ष धोरण म्हणून वापरताना व्यक्तीने ठरवू शकतात. अर्थव्यवस्थेत एकूण उत्पादन पातळी व रोजगार पातळी स्थिर आहे. म्हणून त्यासाठी उपाययोजना करण्याची गरज नाही. असे मानल्यास धोकादायक होईल. कारण काही वेळा शेतीचे उत्पादन घटेल, तेथील रोजगार कमी होईल तर त्याच वेळी औद्योगिक वस्तूंच्या उत्पादनात वाढ ~~होईल~~ होऊन रोजगार वाढेल तर एकत्रित अर्थव्यवस्थेतील उत्पादन व रोजगार पातळी स्थिर राहील. अशावेळी सरकारकडून शेतीकडे दुर्लक्ष होऊन ग्रामीण अर्थव्यवस्था कोलमडण्याची भीती असते.

(5) सांख्यिकी व संकल्पनात्मक अडचणी –

समग्रलक्षी अर्थशास्त्रीय संकल्पनांचे मापनासाठी योग्य संकल्पना व परस्परसंबंधांची खात्रीशीर आकडेवारी माहिती उपलब्ध असणे गरजेचे असते परंतु ती उपलब्ध होत नाही. विशेषतः चलनांची बेरीज करताना सर्व घटक एकजिनसी असणे ~~गरज~~ गरजेचे असते. ~~पण~~ परंतु प्रमाण व्यवहारात तसे आढळत नाही. याशिवाय ती चलने मोजण्यासाठी वेगवेगळे निर्देशांक वापरले जातात त्यामुळे त्यांची बेरीज ~~करणे~~ करणे किंवा सरासरी काढणे कठीण बनते.

Scanned with OKEN Scanner